विशुध्द विद्यालय, यवतमाळ संचलित बाबाजी दाते इंग्लिश मिडियम स्कूल, ता.जि.यवतमाळ या शाळेचे विशुध्द सॉ-मिल, उमरसर, ता.जि.यवतमाळ येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्राशास्थ ३२१९/प्र.क्र.४१२/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०७ मार्च, २०१९

वाचा :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/(५९/१२)माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :- विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांचे क्र.प्राथ/क/१०५५२/२०१७, दिनांक १६ जून, २०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

विशुध्द विद्यालय, यवतमाळ संचलित बाबाजी दाते इंग्लिश मिडियम स्कूल, ता.जि.यवतमाळ (पूर्वीचे नाव- रामगोपाल बजोरीया इंग्रजी प्राथमिक शाळा, बाजोरीया नगर, ता.जि.यवतमाळ) या इंग्रजी माध्यमाच्या कायम विनाअनुदानित शाळेचे, विशुध्द सॉ-मिल, उमरसर, ता.जि.यवतमाळ येथे स्थलांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त शाळेचे सध्याच्या ठिकाणची भाडयाची इमारत जीर्ण व धोकादायक झाल्याने स्वमालकीच्या प्रशस्त इमारतीमध्ये शाळेचे स्थलांतर होत आहे. सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे :-

(१) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(२) स्थलांतरास सर्व शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांची सहमती असावी. तसेच सर्व पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना स्थलांतरित ठिकाणी सामावून घेण्यात येईल व त्यांच्या सेवाशर्तीमध्ये बदल होणार नाही याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार स्थलांतराच्या ठिकाणी शाळेसाठी पक्की इमारत व सर्व भौतिक सुविधा आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिवांचे रू.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटरी केलेले शपथपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(४) सदर शाळेच्या स्थलांतरासाठी विहित दरानुसार शुल्क भरून घेण्यात यावे.

(५) शासनाकडून शाळा, शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी, वेतन, विद्यार्थी इ. संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ. चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(६) स्थलांतरीत शाळेच्या बाबतीत मूळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाही.

(७) सदर शाळा यापुढे स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर चालविणार असल्याबाबत व भविष्यात शासनाकडे कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करणार नसल्याबाबत सदर संस्थेने शपथपत्र सादर केले आहे. त्यानुषंगाने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील शाळांबाबतच्या अटी/ शर्ती या शाळेस लागू राहतील.

(८) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. वरील अट क्र. (२), (३) व (४) ची पूर्तता झाल्यावर, विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत आवश्यक पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७१२०५५८२९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.03.07 12:08:59 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत –

१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती
३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, यवतमाळ
४) अध्यक्ष/ सचिव, विशुध्द विद्यालय, यवतमाळ
५) निवडनस्ती (एसएम-१).